महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०२५/प्र.क्र.७१/विदेशी-२, दि. २७/०६/२०२५.

**विषय :-** बांग्लादेशी नागरिकांच्या घुसखोरीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०२५/प्र.क्र.७१/ विदेशी-२, दि. २७/०६/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६२७१७३७४२८३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-07-2025 22:17:17

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
कार्यासन अधिकारी, का.क्र.२०

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

बांग्लादेशी नागरिकांच्या घुसखोरीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने <u>करावयाच्या उपाययोजनांबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२५/प्र.क्र. ७१/विदेशी-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.
दिनांक: २७ जून २०२५.

**<u>शासन परिपत्रक:-</u>**

महाराष्ट्र हे एक प्रगतीशील राज्य असल्यामुळे राज्यात रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने बांग्लादेशी घुसखोर नागरिक राज्यात येत असतात. राज्यामध्ये आलेल्या बांग्लादेशी घुसखोर नागरिकांकडून राज्यात त्यांच्या वास्तव्यासंबंधातील पुरावे तयार करण्यासाठी, तसेच राज्याच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ते वेगवेगळे शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र धारण करतात. राज्याच्या व्यक्तिगत लाभांच्या ज्या योजना असतात, त्या योजनांमध्ये देखील बांग्लादेशी घुसखोर नागरिक मिळविलेल्या शासकीय दस्तऐवजांच्या/ प्रमाणपत्रांच्या आधारे योजनांच्या लाभासाठी अर्ज करतात. परिणामी राज्याच्या योजनांवर होणाऱ्या खर्चामध्ये अनावश्यक वाढ होत असते व बांग्लादेशी घुसखोर नागरिकांकडून राज्याच्या सुरक्षिततेसही धोका संभावण्याची शक्यता असते.

२. बांग्लादेशी नागरिकांची घुसखोरी थांबविणे, त्यांना शासकीय योजनांचा लाभ न देणे तसेच, बांग्लादेशी घुसखोर नागरिकांकडून राज्याच्या व पर्यायाने देशाच्या सुरक्षिततेस निर्माण होणारी बाधा रोखणे या बाबी विचारात घेऊन, बांग्लादेशी नागरिकांच्या घुसखोरीला आळा घालणे हे राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांचे कर्तव्य आहे.

३. कमी मोबदल्यात बांग्लादेशी घुसखोरांची काम करण्याची तयारी असल्यामुळे व ते कमी मोबदल्यात काम करण्यासाठी उपलब्ध होत असल्यामुळे, राज्यात विविध यंत्रणा

(स्टेक होल्डर्स) बांधकाम व्यावसायिक, छोटे मोठे उद्योगधंद्यावाले, व्यापारी इत्यादी समाजातील व्यावसायिक घटक त्यांचा वैयक्तिक फायदा विचारात घेवून, अशा घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना कामावर ठेवत असल्याचे पोलीस विभागाच्या चौकशीत आढळून आलेले आहे. अशा घुसखोर नागरिकांमुळे आपल्या राज्याच्या पर्यायाने देशाच्या राष्ट्रीय सुरक्षिततेस बाधा येत असल्याचे ते विचारात घेत नाहीत. राष्ट्रीय सुरक्षा ही सर्वोच्च असल्याने घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना कोणत्याही कामगार/ व्यावसायिक आस्थापनांवर ठेवण्यात येऊ नये. या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना या संदर्भात सुचना द्याव्यात, त्याच प्रमाणे प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली येणाऱ्या विविध आस्थापनांवर (उदा. बांधकाम मजुर, मेकॅनिक, वेल्डर, वाहन चालक, प्लंबर, वेटर इ.) घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना कोणत्याही प्रकारचा रोजगार दिला जाणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सुचना देण्यात याव्यात. तसेच असे घुसखोर बांग्लादेशी नागरिक ज्या आस्थापनांवर काम करीत असल्याचे आढळून येईल, अशा आस्थापनांच्या मालकांना त्याबाबत जबाबदार धरले जाईल, याची जाणीव संबंधित आस्थापना मालकांना करून देण्यात यावी. त्यासाठी आवश्यक ते आदेश वा त्या संबंधातील अधिनियम, नियम, विनियम यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्यास, तशा सुधारणा विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने करण्यात याव्यात.

४. घुसखोर बांग्लादेशी नागरिक राज्यात आल्यानंतर त्यांना येथे वास्तव्य करण्यास मिळावे यासाठी ते विविध पुरावे/ शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र प्राप्त करून घेत असतात. सध्याच्या प्रचलित तंत्रज्ञानाचा गैरवापर करून काही वेळा मुळ कागदपत्रांमध्ये छेडछाड करून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय दस्तऐवज/प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त होत असतात. त्यामुळे अर्जासोबत सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा सदरहू प्रमाणपत्र ज्या यंत्रणांनी निर्गमित केलेले आहे, त्या यंत्रणांकडून करणे योग्य ठरते. त्यासाठी अर्जासोबत जोडलेले कागदपत्र/पुराव्यांची पडताळणी करण्याकरिता प्रशासकीय विभागांनी ऑनलाईन प्रणाली विकसित करावी. जेणेकरून पडताळणीमध्ये

वेळ जाणार नाही व पडताळणी/खातरजमा होऊन योग्य व्यक्तीस शासकीय दस्तऐवजांचे/प्रमाणपत्राचे वितरण होईल. अशा प्रकारे पडताळणी केल्यानंतर खोट्या कागदपत्रांच्या आधारे अर्ज केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे अर्ज रद्द करावेत व त्याच कागदपत्रांच्या आधारे परत अर्ज करता येणार नाही, या संदर्भात आवश्यक ती उपाययोजना/कार्यप्रणाली विकसित करावी. खोट्या कागदपत्रांच्या आधारे शासकीय दस्तऐवज प्राप्त केल्याचे निदर्शनास आल्यास अशा घुसखोर बांग्लादेशी नागरिकांची स्वतंत्र यादी तयार करावी. अशी यादी त्या त्या विभागाने त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी. जेणेकरून ती यादी अन्य शासकीय विभागासाठी उपलब्ध होईल व त्या यादीत समाविष्ट असलेल्या नागरिकांना अन्य विभागाकडून कोणतेही दस्तऐवज/ प्रमाणपत्र दिले जाऊ शकणार नाहीत. शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र वितरीत करताना सादर करण्यात आलेल्या छायांकीत प्रतीची खातरजमा आवश्यक असल्यास डीजी लॉकरवर उपलब्ध असलेल्या प्रमाणपत्रांवरून करण्यात यावी. जेणेकरून कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये अचुकता येऊ शकेल.

५. विविध प्रशासकीय विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध व्यक्तिगत लाभांच्या योजनासाठी वा अन्य हेतूने वैयक्तिक हमी पत्र (Declaration) घेण्यात येत असतात. अशा हमी पत्रात "जर ती व्यक्ती भारतीय नागरिक नसल्याचे व खोट्या कागदपत्रांच्या आधारे योजनांचा लाभ घेत असल्याचे निदर्शनस आल्यास ती व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहील", असा उल्लेख हमी पत्रामध्ये करण्यात यावा. विविध शासकीय विभागांकडून देण्यात येणाऱ्या शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र बांग्लादेशी घुसखोरांना बनावट कागदपत्रांच्या आधारे देण्यास मदत करणारे देखील फौजदारी कारवाईस पात्र राहतील, यासंदर्भात संबंधितांना जाणीव करून देण्यात यावी. बांग्लादेशी घुसखोरांनी धारण केलेली कागदपत्र/ प्रमाणपत्र, बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास, असे कागदपत्र/ प्रमाणपत्र निरस्त (रद्द) करण्याबाबत संबंधित विभागाने तत्काळ कार्यवाही करावी. त्यासाठी आवश्यकता असल्यास संबंधित अधिनियम, नियम, विनियमामध्ये सुधारणा करावी.

६. ग्रामीण भागात काही दाखले हस्तलिखित स्वरूपात दिले जातात. हस्तलिखित स्वरूपात दिलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड, छेडछाड करण्यास वाव असतो. त्यामुळे शक्यतो सर्वच शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र डिजिटल स्वरूपात देण्याबाबत व त्याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी अशा दस्तऐवज/ प्रमाणपत्रावर बार कोड (Bar Code), क्युआर कोड(QR Code) देण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी विचार करावा. जेणेकरून समोर आलेल्या कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची बार कोड (Bar Code), क्युआर कोड (QR Code) वरून छाननी/ पडताळणी करणे शक्य होईल.

७. शासकीय दस्तऐवज/ प्रमाणपत्र देणाऱ्या यंत्रणांमध्ये बहुतांश ठिकाणी कंत्राटी कर्मचारी कार्यरत असतात. कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून चुकीचे/ बनावट कागदपत्रांच्या आधारे एखादे प्रमाणपत्र वितरित झाल्यास भविष्यात अशा बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीकडून देशाच्या सुरक्षिततेला बाधा पोहचू शकते, याची जाणीव/ जागरूकता शासकीय दस्तऐवज तयार करणाऱ्या व ते वितरीत करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना करून देण्यात यावी. तसेच अलिकडे ग्रामीण भागात जोड व्यवसायात मदत करण्यासाठी कमी मोबदल्यावर कामगार/ परदेशी नागरिक उपलब्ध होतात. ग्रामीण भागातील नागरिकांना अशा कामगार/ परदेशी नागरिकांना कामावर ठेवताना त्यांचा पूर्वेतिहास/ पूर्व चारित्र्य याबाबतची कोणतीही माहिती नसते. अशा वेळी या व्यवस्थेचा गैर फायदा घेऊन बांग्लादेशी घुसखोर ग्रामीण भागात देखील वास्तव्य करू शकतात. त्यामुळे बांग्लादेशी घुसखोरांच्या वास्तव्याबाबत तसेच त्यांच्यामुळे देशाच्या सुरक्षिततेस बाधा पोहोचण्याच्या शक्यतेबाबत ग्रामीण भागात देखील यासंदर्भात पुरेशी जागरूकता होण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या सर्व यंत्रणांनी देखील दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एखाद्या गावात अशा प्रकारे संशयित नागरिक आढळून आल्यास गावच्या पोलीस पाटील यांनी त्याबाबतची माहिती तत्काळ संबंधित पोलीस ठाण्याला कळविणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यामार्फत सर्व पोलिस पाटील यांना देखील सविस्तर सुचना देण्यात याव्यात.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणक संकेतांक २०२५०६२७१७३७४२८३२९ असा आहे. डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ARVIND TULSHIRAM SHETE
Date: 2025.06.27 17:38:43 +05'30'

**(अरविंद तु. शेटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. अपर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, अन्न नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य , मुंबई
१३.अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४.पोलीस आयुक्त , बृहन्मुंबई.
१५.आयुक्त, आयकर विभाग, मुंबई.
१६.विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई.
१७.संचालक, माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई.
१८.विदेशी नोंदणी कार्यालय, मुंबई.
१९.सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
२०.सर्व पोलीस अधिक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
२१.निवड नस्ती, विदेशी-२, गृह विभाग, मंत्रालय , मुंबई.